गणपती बाप्पा मोरया

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# परळी संघर्षनेता

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ निर्विघ्नं कुरूमे देव सर्वकार्येषु सर्वदा

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

वर्षे- 10 वे | अंक क्र. 225 शुक्रवार दि. 29 ऑगस्ट 2025 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060



## गणपती बाप्पा सजावट स्पर्धा

चला तर मग...

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपल्या घरातील गणपती बाप्पा सजावटीचा सेल्फी फोटो काढा 9881265102 या मो.क्रमांकावर वाटसप करा...

पर्यावरण पूरक व आकर्षक सजावटीला दैनिकात प्रसिद्ध तर मिळणारच पण एक योग्य बक्षीस मिळवा

## तर मुख्यमंत्र्यांच्या राजकीय कारकिर्दीला धोका

# मनोज जरांगे यांचा इशारा





नारायणगाव : राज्य सरकारने उपोषणाला दिलेली एक दिवसाची परवानगी म्हणजे मराठा समाजाची चेष्टा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आडमुठी भूमिका सोडून मराठ्यांना न्याय द्यावा, अन्यथा त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धोका निर्माण होईल, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. 'मी गोळ्या झेलण्यास तयार आहे; पण आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही,' असा निर्धारही त्यांनी केला.

मराठा आंदोलकांचे पहाटे जुन्नरमध्ये येथे आगमन आले. किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून पारंपरिक वाद्यांच्या गजरात आंदोलक हे शिवाई मंदिरात आल्यानंतर जरांगे यांच्या हस्ते शिवाई देवीची आरती करण्यात आली. त्यानंतर पत्रकार परिषदेत जरांगे म्हणाले, 'मराठा तरुणांच्या वेदना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी समजून घेणे गरजेचे आहे. उपोषणाला केवळ एक दिवसाची परवानगी देणे म्हणजे मराठा समाजाचा अपमान आहे. यातून काहीही साध्य होऊ नये, असा सरकारचा उद्देश दिसतो. समाजात नाराजी पसरली असून, याबाबतचा संदेश राज्यभर गेला आहे.'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठ्यांच्या नाराजीचा धोका होऊ शकतो. फडणवीस यांना मराठ्यांची मने जिंकण्याची योग्य संधी आहे. त्यांनी मराठाविरोधी भूमिका सोडून दिली पाहिजे. ते आमचे वैरी नाहीत. आम्ही फक्त लोकशाही मार्गाने आरक्षणासाठी भांडतो आहोत. फडणवीस यांनी मराठ्यांचा अवमान न करता, त्यांच्या हक्काच्या ओबीसी आरक्षणाचा विचार करून सन्मान करावा. मराठा समाज उपकार कधी विसरत पान 3 वर

## ना. पंकजाताई मुंडेंनी दिले निर्देश ; जिल्ह्यातील उद्योजकांच्या मागणीची तातडीने घेतली दखल

### » जिल्ह्यातील उद्योगांच्या समस्या निवारणासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आता प्रत्येक बुधवारी बीडमध्ये असणार



मुंबई । दिनांक 28।राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या मागणीची तातडीने दखल घेतली असून त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्ह्यातील उद्योगांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आता आठवड्यातील प्रत्येक बुधवारी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी बीड मध्ये उपलब्ध असणार आहेत. दरम्यान, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालय देखील लवकरच बीडमध्ये आणण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे प्रयत्नशील पान 3 वर

**प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालयही लवकरच बीडला होणार**

## उपमुख्यमंत्री अजित पवार शुक्रवारी श्रीगोंद्यात तर शनिवारी खासदार शरद पवार नगर शहरात



अहिल्यानगर: आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या, शुक्रवारी श्रीगोंद्यात तर परवा, शनिवारी खासदार शरद पवार नगर शहरात येत आहेत. दोन्ही पवारांच्या कार्यक्रमातील राजकीय भाष्याची उत्सुकता आहे. श्रीगोंद्यात भाजपचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या महायुतीमधीलच विरोधकांना ताकद देण्यासाठी अजित पवारांच्या उपस्थितीत पान 3 वर

## आज ठळक

### वैद्यनाथ बँकेच्या श्री गणेशाची तहसिलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते आरती संपन्न



परळी वैजनाथ प्रतिनिधी : ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलेली व तत्पर सेवा पुरवणारी अग्रगण्य बँक दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि. परळी-वै. च्या कर्मचाऱ्यांनी प्रतिवर्षा प्रमाणे मुख्य कार्यालयात स्थापन केलेल्या श्री गणेशाची सायंकाळची आरती आज परळी-वै. चे तहसिलदार व्यंकटेश मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी

तलाठी विष्णू गीते,परिसरातील सभासद, खातेदार, व्यापारी, ग्राहक, मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खर्चे साहेब,उप सरव्यवस्थापक म्हाळगी साहेब,पवार साहेब व अधिकारी कर्मचारी, तसेच मंडळाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,सचिव, यासह मान्यवर उपस्थित होते.

## वैद्यनाथ बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांची आज निवड

# विनोद सामत आणि रमेश कराड यांचीच फेरनिवड होण्याची शक्यता



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची उद्या शुक्रवारी निवड होणार आहे. अध्यक्षपदी विनोद सामत व उपाध्यक्षपदी रमेश कराड यांचीच फेरनिवड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाची नुकतीच निवडणूक झाली असून यामध्ये राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सर्वच्या सर्व जागा निवडून आल्या आहेत. त्यात चार जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. नवीन संचालक मंडळाची.अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी उद्या बुधवार दिनांक 29 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजता बैठक होणार आहे. पान 3 वर



### विनोद सामत होणार पुन्हा अध्यक्ष?

अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीची ही बैठक केवळ औपचारिक असून अध्यक्षपदी विनोद सामत तर उपाध्यक्षपदी रमेश कराड यांची पुन्हा निवड होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विनोद सामत यांनी बँकेत केलेल्या चांगल्या कामाची त्यांना पावती मिळणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## जाहीर प्रगटन

### (अनुकंपा तत्वावर नोकरी बाबत )

**1) महमद अख्तर महमद सादेख रा. आझाद नगर, परळी वैजनाथ ता. परळी जि. बीड**
**2) मा. शिक्षणाधिकारी साहेब प्रथमिक विभाग जि. प बीड**
**3) मा. उपशिक्षण संचालक साहेब, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद )**
**4) मा. शिक्षण संचालक साहेब, प्राथमिक पुणे**
**5) मा. अध्यक्ष साहेब, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग मुंबई**

आम्ही अध्यक्ष शेख खाजा शेख महेताब व सचिव सय्यद हनीफ करीम महेबूबिया शिक्षण संस्था परळी एफ 131/बीड द्वारा संचलित इमदादुल उलूम प्राथमिक शाळा परळी वैजनाथ जिल्हा बीड खालील प्रमाणे जाहीर प्रगटन द्वारे महमद अख्तर महमद सादेख रा. आझाद नगर, परळी वैजनाथ जि. बीड यास अनुकंपात्तवावर ईमदादुल उलूम प्राथमिक शाळा परळी येथे कनिष्ठ लिपिक पदी संस्था दि 1.8.2025 पासून नव्याने पुन नियुक्ती आदेश संस्थेनी आणि मा.शिक्षणाधिकारी साहेब प्राथमिक विभाग जी.प. बीड यांच्या मार्फत आपणास दिनांक 12.8.2025 रोजी रजि. अन्वे पाठविलेले आहे सदरील आदेश खालील संदर्भ अन्वे आपणस दिलेले आहे. 1) दि. 22.4.2025 रोजी च्या मा राज्य अल्पसंख्याख आयोग यांच्या समोरील सूनवणीचे निष्कर्ष व शिफारस हे मा.राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी शिक्षण संचालक साहेब प्राथमिक पुणे, आणि मा. शिक्षण अधिकारी साहेब, जि. प. बीड यांना पाठवलेले, ते संस्थेस प्राप्त दि. 15.5.2025 , 2) संस्थेचे मा. अध्यक्ष अल्पसंख्याक आयोग महाराष्ट्र राज्य यांना सादर केलेले किंचित आक्षेप अर्ज दि.19.5.2025 3) मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग मुंबई यांचे पत्र जा. क्र. राअआ / संकीर्ण प्र. क /114/2025/का. 3 दि. 9.4.2025 प्राप्त 15.4.2025 4) कक्ष अधिकारी श्री दतात्रिय शिंदे महाराष्ट्र शासन यांचे सर्क्युलर जा. क्र. संकीर्ण - 2022 / प्र क 56 / टिएनटी / 1 दि. 14.9.2022 चे परिपत्रक 5) संस्थेचा मा. अध्यक्ष आहेब राज्य अल्पसंख्याक आयोग व शिक्षण विभाग यांना पुन: खुलासा दिनाक 9.7.2025 6) शाळेस प्राप्त 2023-24 व 2024-2025 संच मान्यता व शालार्थ स्टेटस 7) संस्थेनी शिक्षणाधिकारी प्रा. जि.प बीड यांच्या कार्यलयशी केलेली क. लिपिक पदी नियुक्ती ची चर्चा दि. 29.7.2025 8) संस्थेचे ठराव दि. 31.7.2025 9) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 17.7.2025 अनुकंपा बाबत .. 10) संस्थेनी स्वाक्षरी केलेले महमद अखतर महमद सादेख यांचे 31.7.2025 रोजी चे नियुक्ती आदेश वरील सर्व संदर्भ देऊन संस्थेनी महमद अख्तर महमद सादेख यांना इमदादुल उलूम प्राथमिक शाळा परळी वैजनाथ ता.परळी जि. बीड या शाळेवर कनिष्ठ लिपिक पद नियुक्ती शासनाचे परिपत्रक वरील संदर्भ क्र 4 अन्वे अनुकंपाधारक साठी पद पुनर्जीवितकरता येते या अटीवर व शासन परिपत्रक नुसार आपणास 12.8.2025 रोजी सर्व आवशयक कागद पत्रासह शाळेत आपल्या ला दिलेलेया नियुक्ती आदेशांप्रमाणे रुजू होण्या साठी पाठविलेले असता आपण आज दिनांक 28.8.2025 पर्यंत सेवेत रुजू झालेले नाहीत म्हणून हि अंतिम आणि अगदी शेवटची सूचना आपणास या जाहीर प्रगटन द्वारे देण्यात येते कि, संस्थे नि दिनाक 12.8.2025 रोजी पाठविलेले पत्रानुसार व नियुक्ती आदेशानुसार आपण दिनाक 6.9.2025 पर्यंत सेवेत आपले सर्व मूळ कागदपत्र व मूळ अनुकंपातत्वावर नोकरी साठी सर्व हमी पत्र, शपथ पत्र सर्व कागदपत्रासह आपण रुजू न झाल्यास आपणास अनुकंपातत्वावर नोकरीची आवश्यकता नाही अस ग्रहीत धरून आपले नाव संस्थेच्या अनुकंपा यादीतून कायमस्वरुपी वगळण्यात येईल व नियुक्ती आदेश रद्द समजण्यात येईल.

कळावे आपला,

स्वाक्षरीत/-
**सचिव**
महेबूबिया शिक्षण संस्था परळी

## मराठवाड्यात अतिवृष्टीचा पुन्हा फटका;जनजीवन विस्कळीत



नांदेड: छत्रपती संभाजीनगर गणेश चतुर्थीच्या दिवशी रात्री पुन्हा जोरदार पाऊस झाल्याने नांदेड आणि लातूर जिल्ह्यास अतिवृष्टीचा पुन्हा मोठा फटका बसला आहे. लातूर जिल्ह्यातील 30, नांदेडमधील 17 महसूल मंडळात अतिवृष्टीची झाली. या सर्वाधिक नायगाव तालुक्यातील नरसीमध्ये 115 मिलीमीटर पाऊस झाला. नायगाव शहरातील अनेक घरांमध्ये आता पाणी शिरु लागले आहे. लातूर आणि नांदेड जिल्ह्यातील अनेक मार्गावरील वाहतूक पूर्णत: ठप्प झाली आहे.

नायगाव आणि परिसरात अजूनही पाऊस सुरु आहे. यामुळे पान 3 वर

## मराठा मोर्चादरम्यान दुर्दैवी घटना, मनोज जरांगेंच्या सहकाऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू





मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चामधून एक मोठी बातमी समोर आली आहे. मनोज जरांगे यांच्या एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला. अंतरवाली सराटीवरुन निघालेला जरांगेचा मोर्चा आज सकाळी जुन्नरमध्ये दाखल झाला. या मोर्चादरम्यान हृदविकाराचा झटका येऊन जरांगेंच्या सहकाऱ्याचा मृत्यू झाला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. याआधी जरांगेंचा मोर्चा निघण्यापूर्वी मराठा आरक्षणासाठी लातूरमधील एका तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. या दोन्ही घटनांवर मनोज जरांगेंनी प्रतिक्रिया देत दु:ख व्यक्त केले मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चाचा आज दुसरा दिवस आहे. आज सकाळी ते जुन्नरमध्ये दाखल झाले. मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यासाठी आणि आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने किल्ले शिवनेरी येथे गर्दी केली होती. या मराठा बांधवांमधील एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सतिश ज्ञानोबा देशमुख (वय 40 वर्षे) असं या मृत आंदोलकाचे नाव आहे. सतिश देशमुख हे मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चासोबत मुंबईला जाणार होते. पण मोर्चा मुंबईच्या दिशेने निघण्यापूर्वीच पान 3 वर

## शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष, परळीत बिबदरा पाझर तलाव फुटून शेतीचे मोठे नुकसान



परळी ( बीड) : सततच्या पावसामुळे बोरणा नदीवरील भोजनकवाडी नागदरा येथील बिबदरा पाझर तलाव गुरुवारी सकाळी फुटला आहे. त्यामुळे तलावाखालील शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झाले आहे. 35 वर्षापूर्वी माजी ग्रामविकास राज्य मंत्री पंडितराव दौंड यांच्या मंत्रीपदाच्या काळात बिबदरा पाझर तलाव बांधण्यात आला होता. या तलावाच्या दुरुस्तीची शेतकऱ्यांनी अनेकदा मागणी केली होती. परंतु, पाटबंधारे विभागाने दुर्लक्ष केल्याने पाझर तलाव फुटून शेतजमीनी वाहून जाऊन अतोनात नुकसान झाल्याचा आरोप माजी आमदार संजय दौंड यांनी केला आहे. पान 3 वर

## गणेशोत्सवात वीजपुरवठा खंडित होऊनये – युवानेते राहुल कराड यांची महावितरणकडे मागणी



परळी (प्रतिनिधी) :गणेशोत्सवाच्या दिवसांत परळी शहर व परिसरात वारंवार जाणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशा महत्त्वाच्या सणासुदीच्या काळात वीजपुरवठा खंडित होऊ नये, अशी मागणी युवानेते राहुल कराड यांनी परळी महावितरण कार्यालयाचे उप कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली आहे. याकडे पान 3 वर

# मेजर ध्यानचंद:जगातील महान हॉकीपटूंच्या यादीत अव्वलस्थानी!

## (29 ऑगस्ट :राष्ट्रीय क्रीडा दिन : मेजर ध्यानचंद जयंती विशेष)

व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी खेळाला अनन्य साधारण महत्त्व आहे. खेळाडू जीवनभर आरोग्यदायी राहतात. भारतामध्ये विविध क्रीडा प्रकार प्रसिद्ध आहेत. अनेक खेळाडू जागतिक स्तरावर चमकलेले आहेत. खेळ हा अनेक लोकांच्या आयुष्यातील अविभाज्य घटक असतो. प्रत्येकजण कोणता ना कोणतातरी खेळ प्रकार पसंत करतो. काहीजण खेळाची आवड करिअरच्या दिशेने पुढे नेतात. तर काही लोक आपल्या आवडत्या क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना फॉलो करत खेळाचा आनंद घेतात. देशाला क्रीडाक्षेत्राचा मोठा वारसा लाभलाय. यात हॉकीतील दिग्गज खेळाडू आणि जादूगार अशी ओळख असलेल्या मेजर ध्यानचंद यांना स्मरून राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व पटावे, यास्तव श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर लेखप्रपंच... संपादक.

लाखो देशवासियांसाठी प्रेरणादायी असलेले व्यक्तीमत्व दिवंगत धावपटू मिल्खा सिंग यांच्यासह पी.टी.उषा यांना उडनपरी या नावाने संबोधले जाते, तर सचिन तेंडुलकरला क्रिकेटचा देव तथा मास्टर ब्लास्टर म्हटले जाते. राष्ट्रीय क्रीडा दिवस 29 ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येतो, का? तर महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा हा जन्मदिन आहे, म्हणूनच तो दिवस क्रीडादिन म्हणून देशभरात साजरा करण्यात येतो. राष्ट्रीय क्रीडा दिनी व्यक्तीच्या जीवनात खेळांच्या महत्त्वाबाबत जनजागृती केली जाते. तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यासाठी सर्वांनी खेळ खेळले पाहिजेत, असा संदेश दिला जातो. या दिवशी राष्ट्रपती देशातील क्रीडा क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना खेलरत्न, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार देऊन गौरव करतात.

मेजर ध्यानचंद हे हॉकीमध्ये जगभरात गाजलेले नाव आहे. त्यांना हॉकीचे जादुगार म्हणून ओळखले जाते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन 1922मध्ये वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ते भारतीय लष्करात रुजू झाले. त्यांच्यामध्ये एका खेळाडूचे सर्व गुण होते. लष्करातील सुभेदार मेजर मनोज तिवारी यांनी हॉकी खेळण्यासाठी ध्यानचंद यांना प्रवृत्त केले, त्यांना प्रोत्साहन दिले. स्वत: तिवारींना सुद्धा खेळांमध्ये आवड होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यानचंद यांनी हॉकी खेळण्यास सुरुवात केली. देशातीलच नव्हे तर जगातील महान हॉकीपटूंच्या यादीत अव्वलस्थानी त्यांचे नाव आले. त्यांना पहिल्यापासूनच खेळाची आवड होती. ते एक उत्तम खेळाडू होते. पण त्यांना हॉकीची प्रेरणा मिळाली ती सुभेदार मेजर तिवारी यांच्याकडून, जे स्वत: क्रीडाप्रेमी होते. खेळांमध्ये उत्कृष्ट असल्यामुळे ध्यानचंद यांची 1927 साली बढती लान्स नायक पदावर झाली. त्यानंतर 1932 साली नायक पदावर तर 1936 साली हॉकी टीमचे कॅप्टन असताना त्यांची सुभेदार पदावर बढती झाली. नंतर लेफ्टनंट पदावरुन त्यांची बढती मेजर म्हणून झाली. ते हॉकी खेळण्यात अतिशय निपूण होते. त्यांना देशातील सर्वकालीन उत्कृष्ट हॉकी खेळाडू समजले जाते. हॉकी खेळताना चेंडूवर नियंत्रण मिळवण्यात, फटका मारण्यात, विरोधी खेळाडूकडून अलगद चेंडू काढून घेण्यात, एखादा नवीनच सर्जनशील फटका मारण्यात ते माहीर होते. त्यांनी भारतीय हॉकीला सर्वोच्च स्थानावर नेऊन ठेवले. ऑलम्पिकमध्ये भारताला हॉकीत त्यांनी 3 सुवर्ण पदके मिळवून दिली. सन 1928, 1932 आणि 1936 साली भारताने हॉकीतील सुवर्ण पदक जिंकण्याची कामगिरी केली. 22 वर्षाच्या कारकीर्दीत त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर चारशेपेक्षा जास्त गोल केले, तर कारकीर्दीत एक हजारांपेक्षा जास्त गोल केले. सन 1926 ते 1948 या काळात त्यांनी भारतीय क्रीडा क्षेत्राला एक नवी उंची गाठून दिली. त्यांच्यापासून अनेक खेळाडूंनी प्रेरणा घेतली. राष्ट्रीय क्रीडा दिन 29 ऑगस्टला देशपातळीवर साजरा केला जातो. राष्ट्रपती भवनात या दिवशी समारोह आयोजित केला जातो. क्रीडा क्षेत्रातील मानाचे पुरस्कार विविध खेळाडूंना दिले जातात. खेळाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्याबरोबरच या दिनी मेजर ध्यानचंद यांचे खेळातील योगदान अधोरेखित केले जाते. भारताची समृद्ध क्रीडा संस्कृती आणि वारशात ध्यानचंद यांनी दिलेल्या योगदानाला उजाळा दिला जातो. ध्यानचंद एकमेव खेळाडू आहेत, त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला आहे.

उत्तर प्रदेशमधील प्रयागराज, अलाहाबाद येथील एका राजपूत परिवारात दि.29 ऑगस्ट 1905 रोजी मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सामेश्वर सिंह हे भारतीय सेनेत होते. ध्यानचंद देखील आपल्या वडिलांप्रमाणेच भारतीय सेनेत दाखल झाले आणि येथूनच त्यांचा हॉकी प्रवास सुरु झाला. त्यांचे खरे नाव ध्यानसिंह असे होते. मात्र ते नेहमी चंद्राच्या प्रकाशात हॉकीचा सराव करीत असत. त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना चंद म्हणण्यास सुरुवात केली. नंतर ते ध्यानचंद या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांनी सन 1928, 1932 आणि 1936 या सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांत हॉकीमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आणि त्यांत विजय मिळवून दिला. बर्लिन ऑलिम्पिक 1936मध्ये भारतीय संघाने जर्मनीचा हुकूमशहा अडॉल्फ हिटलरच्या उपस्थितीत जर्मन संघाला अंतिम फेरीत 8-1 अशी धूळ चारली होती. या विजयासह सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांत सुवर्णपदक जिंकून अनोखी किमया साधली. मेजर ध्यानचंद यांनी आंतरराष्ट्रीय हॉकीतील त्यांच्या 22 वर्षाच्या कारकीर्दीत चारशेपेक्षा जास्त गोल करत आपण गोल मशीन असल्याचे सिद्ध केले होते. सन 1956मध्ये भारत सरकारने त्यांना त्यांच्या हॉकी खेळातील योगदानासाठी पद्मभूषण या सन्मानाने भुषविले, तर भारतीय टपाल सेवेने त्यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. ध्यानचंद हे भारतीय सेनेतून मेजर या पदावर असताना निवृत्त झाले. आपल्या निवृत्तीनंतर देखील ध्यानचंद यांचे हॉकीतील योगदान कायम राहिले. पटियालामधील राष्ट्रीय क्रीडा संस्थानमध्ये ते हॉकीचे मुख्य प्रशिक्षक होते. शिवाय त्यांनी राजस्थानमधील बऱ्याच प्रशिक्षण कॅम्पमध्ये देखील प्रशिक्षण दिले. सन 2002 साली दिल्लीतील नॅशनल हॉकी स्टेडिअमचे नामकरण मेजर ध्यानचंद नॅशनल हॉकी स्टेडिअम असे करण्यात आले.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरी करण्यात येते. हॉकीच्या मैदानात ध्यानचंद यांनी अविश्वसनीय कामगिरीची नोंद केली. त्यांच्या कारकिर्दीत भारताने ऑलिम्पिक स्पर्धेत तीन वेळा गोल्डन कामगिरी नोंदविली. दशकानंतही त्यांची जादू कायम आहे. मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. सरकारतर्फे सन 1956मध्ये त्यांना देशातील सर्वोच्च नागरिपुरस्कार असलेला पद्मभूषण देऊन गौरवण्यात आले. त्यांच्यातील कौशल्याबाबत बोलताना स्टिकला चेंडू जणू चिटकलेला असायचा, असे वर्णनही ऐकायला मिळते. एकदा तर चक्क त्यांची हॉकी स्टिक तोडून त्यांत चुंबकिय किंवा अन्य काही गोष्टीचा वापर करण्यात आलाय का? हे पाहण्यात आले होते. ध्यानचंद यांनी सन 1926 ते 1948 दरम्यान चारशेहून अधिक सामने खेळले. यात त्यांनी जवळपास हजार गोल डागण्याचा पराक्रम केला. हॉकीच्या मैदानात अभूतपूर्व कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यासाठी सन 2012पासून भारत सरकारने त्यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. ऑलिम्पिक स्पर्धेत हॉकी संघाने ऐतिहासिक ब्रॉंझ पदक पटकावल्यानंतर क्रीडा क्षेत्रात राजीव गांधी यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या सर्वोच्च खेलरत्न पुरस्काराला त्यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचे दि.3 डिसेंबर 1979 रोजी निधन झाले होते.

!! मेजर ध्यानचंद यांना आणि त्यांच्या हॉकी कौशल्याबद्दल विनम्र अभिवादन तथा सर्व क्रीडाप्रेमींना राष्ट्रीय क्रीडादिन निमित्ताने हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**

# कौशल्याधारित शिक्षण : भारताच्या विकासाचा नवा पाया




**डॉ. भारत कऱ्हाड**

भारताच्या शिक्षण क्षेत्रात आज मोठा बदल घडवून आणण्याची वेळ आली आहे. देशात दरवर्षी लाखो विद्यार्थी उच्च शिक्षण पूर्ण करुन पदव्या घेतात, परंतु त्यातील मोठ्या प्रमाणावर तरुण रोजगाराच्या संधी मिळवण्यात मागे पडतात. याचे कारण म्हणजे विद्यमान शिक्षण प्रणाली ही प्रामुख्याने सैद्धांतिक ज्ञानाभोवती फिरणारी असून, ती उद्योगविश्वाच्या अपेक्षांशी जुळलेली नाही. दुसरीकडे, जे विद्यार्थी कौशल्याधारित शिक्षण किंवा तांत्रिक अभ्यासक्रम निवडतात, त्यांना योग्य संधींचा अभाव जाणवतो. या दोन्ही स्थितींमुळे तरुणाईच्या क्षमतेचा योग्य वापर होत नाही आणि देशाच्या प्रगतीला मोठा अडथळा निर्माण होतो. त्यामुळे आता आवश्यक आहे ती शिक्षणाच्या धोरणात भक्कम आणि मूलगामी सुधारणा करुन त्याला कौशल्यांचा पाया देण्याची.

जागतिक पातळीवर पाहिले तर रोजगार बाजाराला आज फक्त पदवीधर नव्हे तर कौशल्यसंपन्न, त्वरित काम करण्यास तयार आणि नवनव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊ शकणारे तरुण हवे आहेत. पदवी हा एक पाया असतो, पण रोजगार आणि उद्योजकतेची खरी इमारत बांधली जाते ती कौशल्यांच्या भक्कम विटांनी. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, रोबोटिक्स, हेल्थकेअर, पर्यटन, लॉजिस्टिक्स अशा अनेक क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाची झपाट्याने होत असलेली प्रगती पाहता पारंपरिक शिक्षण पुरेसे राहिलेले नाही. म्हणूनच शैक्षणिक अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कौशल्यांचा समावेश करणे ही काळाची मागणी आहे.

आजच्या आकडेवारीनुसार बेरोजगारीचा सर्वाधिक फटका बसलेला आहे तो सुशिक्षित तरुणांना. जर ही परिस्थिती बदलली नाही, तर आपली लोकसंख्या ही आपली सर्वात मोठी ताकद ठरण्याऐवजी उलट ओझे ठरेल. मात्र, जर आपण या तरुणांना योग्य प्रशिक्षण, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य दिले, तर हाच तरुण वर्ग भारताला जगातील सर्वात मोठा कौशल्याधारित देश बनवू शकतो. शिक्षणाची दिशा रोजगार आणि उद्योजकतेशी जोडणे आवश्यक आहे.

कौशल्याधारित शिक्षणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते उद्योगांच्या गरजांशी थेट संलग्न असते. विद्यार्थी शिकताना जे ज्ञान व अनुभव मिळवतो ते उद्योगक्षेत्राला उपयुक्त ठरते. यासाठी शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात सशक्त भागीदारी आवश्यक आहे. इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप, प्रत्यक्ष प्रकल्प, प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण केंद्र यांचा अभ्यासक्रमात समावेश केला गेला पाहिजे. अशा शिक्षणातून बाहेर पडलेले विद्यार्थी नोकरीच्या पहिल्याच दिवशी प्रत्यक्ष योगदान देऊ शकतात.

दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे व्यावसायिक शिक्षणाला समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे. आजही एक समज आहे की फक्त पदवीधर झाले तरच यश मिळते. पण प्रत्यक्षात रोजगार आणि अर्थव्यवस्थेला ज्यांची सर्वाधिक गरज आहे ते म्हणजे तांत्रिक तज्ञ, आरोग्य सहाय्यक, कारागीर, संगणक व्यावसायिक, डेटा विश्लेषक, तंत्रशिल्पी वगैरे. या सर्व क्षेत्रांना सामाजिक सन्मान मिळालाच पाहिजे. जेव्हा विद्यार्थी शिकतानाच काही काम करतो, तेव्हा त्याला आत्मविश्वास मिळतो आणि समाजही व्यावसायिक शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन ठेवतो.

कौशल्याधारित शिक्षण ही सामाजिक समतेची किल्ली देखील आहे. ग्रामीण भागातील, वंचित घटकांतील आणि महिलांतील विद्यार्थ्यांसाठी हे मोठे व्यासपीठ ठरते. ग्रामीण भागातील मुली वाहनतंत्रज्ञान शिकतात, लहान शहरांतील युवक डिजिटल क्षेत्रात नाव कमावतात, हे चित्र आता दिसू लागले आहे. अशा प्रकारे समाजाच्या सर्व घटकांना समान संधी मिळाल्यास खऱ्या अर्थाने समावेशक विकास साधता येतो. कौशल्य प्रशिक्षणामुळे बेरोजगारी, दारिद्र्य आणि विषमता यांमध्ये घट होऊ शकते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला गेला आहे. परंतु या तरतुदी प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत कौशल्य प्रशिक्षण अनिवार्य केले गेले पाहिजे. स्थानिक आणि प्रादेशिक गरजांनुसार अभ्यासक्रम आखले गेले पाहिजेत. उदाहरणार्थ, कृषीप्रधान भागात शेतीसंबंधी तंत्रज्ञान, समुद्रकिनारी भागात मत्स्यव्यवसाय व पर्यटन, तर शहरी भागात आरोग्य व माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण जास्त उपयुक्त ठरेल.

अशा धोरणामुळे अनेक परिणाम साधता येतील. रोजगारक्षमतेत वाढ होईल, उद्योजकतेला चालना मिळेल, उद्योगांना तज्ज्ञ मनुष्यबळ मिळेल आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्था गतीमान होईल. त्याचबरोबर समाजातील सर्व घटकांना संधी मिळाल्यामुळे सामाजिक समतेत सुधारणा होईल. एकूणच, तरुणांना 'रोजगार शोधणारे' न ठेवता 'रोजगार निर्माण करणारे' बनवणे शक्य होईल.

जगातील सर्वाधिक तरुणसंख्या भारताकडे आहे. योग्य दिशादर्शन मिळाल्यास हा तरुण वर्ग जगभरात कौशल्यांची मागणी पूर्ण करु शकतो. रोजगाराच्या संधी फक्त देशापुरत्याच मर्यादित राहणार नाहीत तर परदेशातही भारतीय कौशल्यसंपन्न युवकांचे योगदान वाढेल. त्यामुळे 'स्किल इंडिया' आणि 'मेक इन इंडिया' या संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे.

शेवटी, भारताच्या शैक्षणिक बदलाचा पाया डिजिटलायझेशन किंवा फक्त अभ्यासक्रमीय सुधारणा नसून शिक्षणव्यवस्था कौशल्यकेंद्री करणे हा आहे. शिक्षण हे केवळ पदवी देणारे न राहता रोजगारक्षम, आत्मनिर्भर आणि उद्योजक घडवणारे असले पाहिजे. ज्या राष्ट्राने आपल्या युवकांमध्ये कौशल्यांचा ठेवा निर्माण केला तो राष्ट्र केवळ आर्थिक प्रगतीच नव्हे तर राष्ट्रीय सन्मान आणि जागतिक स्पर्धात्मकता देखील मिळवतो. म्हणूनच आज भारताच्या विकासासाठी सर्वात महत्वाचा पाया म्हणजे कौशल्याधारित शिक्षण होय. "फक्त शिकवणे पुरेसे नाही, सक्षम करणे आवश्यक आहे—हीच भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठीची खरी दिशा आहे."

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार.

## 29 ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिवस





29 ऑगस्ट 1905 मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रुपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत 1928, 1932, 1936अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले.यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे.यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते.याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे. आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले.त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात.त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.याचाच आनंद देशातील 140 कोटी जनता नेहमी घेत असते. आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे.कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.1935 साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.1936 साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता.जर्मनी विरुद्ध भारत असा सामना होत असतांना भारताने जर्मनीचा 8 विरुद्ध 1 गोलनी दनदणीत पराभव केला.हा खेळ पाहुण हिटलर आश्चर्य चकित झाले.खेळ संपल्यानंतर हिटलरने मेजर ध्यानचंद यांना भेटीचे निमंत्रण दिले. या भेटीमध्ये हिटलरने मेजर ध्यानचंद यांचे खुप कौतुक केले व त्यांच्या खेळण्याची जादु पाहून जर्मनी सैन्यात मोठे पद देण्याची कबुल केले.परंतु मेजर ध्यानचंद यांचे राष्ट्रप्रेम सर्वोपरी होते.त्यामुळे मेजर ध्यानचंद यांनी हिटलरची ऑफर नाकारली व त्यांनी हिटलरला सांगितले की माझ्यासाठी माझी मातृभुमि महान.1928 ते 1964 हे युग भारतीय हॉकीसाठी सुवर्ण युग मानल्या जाते.कारण या काळात आठ ऑलिंपिकमध्ये सात सुवर्ण पदक मिळाले होते हा भारतासाठी गौरवशाली इतिहास आहे.काही दिवसांपूर्वी महिला कुस्तीपटूंवर मोठा अन्याय झाला होता व न्याय मिळावा यासाठी खेळाडूंना रस्त्यावर यावे लागले ही चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बाण-शान आहे.त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच.तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल. देशातील संपूर्ण तळागाळातील खेळाडूंना विनंती करतो की देशातील वाढते बदलते हवामान, वाढते तापमान, वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेली ऑक्सिजनची मात्रा पहाता आज वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे 29 ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण खेळाडूंनी,सरकारनी,शाळा-महाविद्यालय व स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे असे मला वाटते.कारण आज लावलेले वृक्ष अनंत काळापर्यंत जिवित राहिल व 29 ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर**

# सावित्री कलयुगतील या मराठी चित्रपटा ची टीम चा अमरावतीत भव्य सत्कार





17 /8/2025 रोजी बी एस एफ बहुउद्देशीय संस्था, अमरावती, उपेक्षित नायक न्यूज, व संतकबीर बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने " समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा 2025 " अमरावती येथील हॉटेल राज पॅलेस येथे नुकताच पार पडला. त्यामध्ये विविध क्षेत्रात जसे नाटक, चित्रपट क्षेत्रातील, कवी, लेखक, डॉक्टर, वकील, अशा उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होता.

या कार्यक्रमास धुळे येथून सावित्री कलयुगातील या मराठी चित्रपट चे निर्माते कराटे मास्टर नानासाहेब बच्छाव यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यकामाचे वेळी दीप प्रज्वलन सावित्री कलयुगातील या मराठी चित्रपटचे निर्माते नानासाहेब बच्छाव व प्यारेलाल शर्मा सरांनी केले.

या चित्रपटा चे रायटर,डायरेक्टर पयरेलाल जी शर्मा यांनी निर्माते कराटे मास्टर नानासाहेब बच्छाव यांना सन्मानपत्र आणि पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाल पुष्प गुच्छ, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी अभिनेत्री श्वेता भामरे, मेक अप आर्टिस्ट वदंना सूर्यवंशी हे उपस्थित होते.

बी एस एफ अमरावती च्या टीम ने त्यांना पुढील वाट चालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र भर त्यांचे कौतुक व अभिनंदनाचा पाऊस पडत आहे.

# श्री. धनंजय यादव आणि श्री. मनीष दळवी यांची महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या संचालक पदी नियुक्ती





मुंबई, दि. 28 ऑगस्ट 2025 – महाराष्ट्र शासनाने राज्यातील काजू उद्योगाच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य काजू मंडळावर दोन नवे स्वतंत्र संचालक नियुक्त केले आहेत. शासन निर्णयान्वये श्री. धनंजय यादव यांना सहकारी काजू प्रक्रिया प्रकल्प महासंघाचे प्रतिनिधी आणि श्री. मनीष प्रकाश दळवी यांना काजू क्षेत्रातील तज्ज्ञ संचालक म्हणून नेमले आहे.

राज्यातील काजू पिकाच्या विकासासाठी 16 मे 2023 रोजी महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची स्थापना झाली होती. सुरुवातीला मंडळात 12 संचालक आणि 1 सदस्य सचिव होते; परंतु 22 ऑगस्ट 2025 रोजी सुधारित रचनेत स्वतंत्र संचालकांची संख्या 4 वरून 11 केली गेली. या बदलामुळे विविध क्षेत्रांना व्यापक प्रतिनिधित्व मिळाले असून मंडळ अधिक सर्वसमावेशक बनले आहे.

श्री. धनंजय यादव हे दापोली येथील आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशनचे सभापती असून शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे प्रसिद्ध आहेत. तसेच त्यांचा हॉटेल वोल्गा रेसिडेन्सी आणि कोकण काजू प्रक्रिया उद्योग हा दापोलीतील महत्त्वाचा व्यवसाय आहे, ज्यामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यांच्या निवडीवर स्थानिक समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

तसेच, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील श्री. मनीष प्रकाश दळवी हे काजू पिकाच्या उत्पादनक्षमता वाढवणे, प्रक्रिया तंत्रज्ञान सुधारणा आणि निर्यात क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरणारे तज्ज्ञ आहेत.

श्री. यादव व श्री. दळवी यांची नियुक्ती केल्याबद्दल संस्थेचे कार्यवाह डॉ. दशरथ भोसले, जानकीताई बेलोसे, सुनिता बेलोसे, अनंत सणस, डॉ.दीपक हर्डीकर, प्राचार्य सीए डॉ. भारत कऱ्हाड, सीए संदीप कोचरे, डॉ. सीए. एम. एस. जाधव, वंजारी महासंघाच्या प्रदेशाध्यक्ष डॉ. सौ. सुवर्णा कराड यांसह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या नियुक्त्यांमुळे शेतकरी, उद्योजक, सहकारी संस्था व तज्ज्ञ या सर्व घटकांचा सहभाग अधिक बळकट होईल आणि महाराष्ट्रातील काजू उद्योगाचा विकास वेगाने घडून येईल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

नाही; पण अपमान करणाऱ्याला सोडत नाही,' असेही जरांगे म्हणाले.शिंदे समितीने कुणबी नोंदीबाबत दिलेला अहवाल फेटाळून जरांगे म्हणाले, 'गॅझेटमध्ये कुणबींची संख्या स्पष्टपणे नमूद आहे, केवळ आकडेवारी नाही,'आंदोलकांनी संयम आणि शांतता राखावी. नियमांचे पालन करावे. कोणत्याही चुकीमुळे समाजाच्या तोंडाशी आलेला घास हिरावला जाऊ नये. गरज भासल्यास आंदोलक टप्प्याटप्प्याने ये-जा करु शकतात, जेणेकरुन आंदोलनाची धार कायम राहील,' असेही त्यांनी सांगितले.मराठा आरक्षण आंदोलनात सक्रिय असलेले सतीश ज्ञानोबा देशमुख (वय 44) या आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. जरांगे यांच्या ताफ्यासोबतच त्यांचे वाहन होते. ते लेण्याद्री येथे रात्री मुक्कामी होते. गुरुवारी सकाळी नारायणगाव येथे त्यांना हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला. उपचारासाठी त्यांना नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, वडील, भाऊ असा परिवार आहे. देशमुख हे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील वरगावचे रहिवासी आहेत.

------------------------------------------

आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मराठवाडा विभागाचे प्रादेशिक कार्यालय सध्या छत्रपती संभाजीनगर येथे असून उप प्रादेशिक कार्यालय जालना, नांदेड, लातूर आणि परभणी येथे आहेत. बीड जालन्याला तर परळी परभणीला जोडलेले आहे. बीडला प्रदूषण नियंत्रण मंडळाचे स्वतंत्र उप प्रादेशिक कार्यालय असावे अशी उद्योजकांची मागणी आहे, त्यानुसार ना. पंकजाताई मुंडे यासाठी प्रयत्नशील असून बीडचे कार्यालय प्रस्तावित आहे.स्वतंत्र कार्यालय होईपर्यंत जिल्हयातील औद्योगिक व उद्योगांशी संबधित समस्या हाताळण्यासाठी एखादा उप प्रादेशिक अधिकारी असावा अशी उद्योजकांची मागणी होती, त्यानुसार ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पर्यावरण विभागाला तातडीने निर्देश दिले. यासंदर्भातछत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी मनिष होळकर यांनी परिपत्रक काढले असून बीड येथील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील असे म्हटले आहे.

------------------------------------------

श्रीगोंद्यात शेतकरी मेळावा होणार आहे. माजी आमदार बबनराव पाचपुते व त्यांचे चिरंजीव आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचे श्रीगोंद्यातील बहुतांशी विरोधक एकत्र आले आहेत व त्यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीपूर्वी श्रीगोंद्यात उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा होणार आहे.श्रीगोंद्यातील घनःश्याम शेलार, नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, अण्णासाहेब शेलार, बाळासाहेब नाहाटा, दत्तात्रय पानसरे, भगवानराव पाचपुते आदींसह माजी आमदार राहुल जगताप यांनी अजित पवारांच्या उपस्थितीत होणाऱ्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. शेतकरी कर्जमाफी, घोड कुकडी पाणी प्रश्न, फसवणूक झालेल्या सिस्पे गुंतवणूकदारांचे पैसे मिळण्यासाठी उपाययोजना, संत शेख महंमद महाराज देवस्थानची वक्फ बोर्डाकडे झालेली नोंद आदी विषयांवर चर्चा अपेक्षित आहे. याशिवाय ते आमदार पाचपुतेंवर टीका करतात का, याबद्दल औत्सुक्य आहे.दुसऱ्या राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवार शनिवारी नगरला येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरुण कडू पाटील यांचा अभीष्टचिंतन सोहळा होणार आहे. काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार नीलेश लंके, माजी खासदार यशवंतराव गडाख, समारंभाचे निमंत्रक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे उपस्थित राहणार आहेत.

यानिमित्ताने पक्षाचा कार्यकर्ता मेळावा शनिवारी दुपारी राष्ट्रवादी भवनमध्ये होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी सांगितले. या मेळाव्यास जिल्हा प्रभारी अशोकबाप्पू पवार, खासदार लंके, प्रसाद तनपुरे, आमदार रोहित पवार, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, जिल्हा निरीक्षक अंकुश काकडे, माजी आमदार दादा कळमकर उपस्थित राहणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या, शुक्रवारी श्रीगोंद्यात तर परवा, शनिवारी खासदार शरद पवार नगर शहरात येत आहेत. दोन्ही पवारांच्या कार्यक्रमातील राजकीय भाष्याची उत्सुकता आहे.

------------------------------------------

वैद्यनाथ बँकेच्या मुख्य कार्यालयात होणाऱ्या बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून समृत जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

------------------------------------------

ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याच्या मागणीला तीव्र विरोध करण्यात आला. तसेच ओबीसी आंदोलनाची दिशाही ठरविण्यात आली.यावेळी बोलताना ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले की, उद्यापासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जनजागृती मोहिम राबवली जाईल आणि पत्रकार परिषद घेऊन ओबीसी समाजाची भूमिका मांडली जाणार आहे. त्यानंतर 30 ऑगस्ट 2025 रोजी नागपूरातील संविधान चौकात साखळी उपोषण केले जाईल. इतर जिल्ह्यांमध्ये स्थानिक पदाधिकारी उपोषण करुन सरकारचे लक्ष वेधणार आहेत. आम्ही 15 दिवसांत मुंबईकडे कूच करण्याची तयारी करत आहोत. यातून आम्ही सरकारचे लक्ष आमच्या मागण्यांकडे वेधू असं तायवाडे म्हणाले.आम्हाला सरकारने हमी दिली आहे, त्यावर सरकारने ठाम रहावे. ओबीसी समाजाला जे आरक्षण दिले जात आहे त्याला धक्का लागू नये. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊन ओबीसी समाजाचे आरक्षण कमी करु नये. तसेच मराठा समाजाला ज्यांच्याकडे कोणतेही पुरावे नाहीत, त्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देऊ नयेत' अशी मागणीही डॉ. बबनराव तायवाडे यांनी केली.मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीवर बोलताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके म्हणाले की, मनोज जरांगे पाटलांची मागणी बेकायदेशीर आहे. सरकारने त्यांना फॅक्ट समजून सांगितला पाहिजे, नाहीतर महाराष्ट्रात अराजकता निर्माण होऊ शकते. मराठा तेवढाच मेळवावा ओबीसी मुळासकट संपवावा असाच जरागेच्या मागणीचा अर्थ होतो. ओबीसी जरांगेंच्या आंदोलनाला प्रति आंदोलन पुकारतील त्यांची संख्या जेवढी आहे त्याच्या दहापट संख्या महाराष्ट्राच्या रस्त्यावर उतरलेली दिसेल असंही हाके यांनी म्हटलं आहे.

------------------------------------------

पुन्हा एकदा अतिवृष्टीचा पिकांना मोठा फटका बसला आहे. लातूर जिल्ह्यात सर्वदूर पाऊस झाला असून रात्री झालेल्या पावसामुळे खालील मार्गावर पुलावरुन पाणी वाहत आहे. त्यामुळे माणकेश्वर – उदगीर, बोटकुळ – निलंगा, अतनूर येथील पुलावरुन पाणी वाहत असल्याने उदगीर-अतनूर-बाराळी रस्ता बंद आहे. उटी व अलमला रस्त्यावरतसेच दैठना येथील पुलावरुन पाणी वाहत असल्यामुळे अजनी ते उदगीर वाहतूक बंद आहे. औसा ते हसलगन रोडवर जवळगावाडी येथे पुलावरुन पाणी जात आहे. तसेच एकंबा येथील पुलावर पाणी आल्यामुळे सदर मार्गावरील वाहतूक बंद आहे. धडकनाळ बोरगावच्या पुलावर पाणी आल्यामुळे उदगीर ते देगलूर मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे.नायगाव तालुक्यातील नरसी – बिलोली हा मार्गही वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. मुखेड तालुक्यात पुन्हा मुळसधार पावसाने थैमान घातले आहे. जाहूर – उंद्री – देगलूर हा मार्ग बंद झाला आहे. शेत शिवारात जिकडे – तिकडे पाणीच पाणी घुसले आहे. त्यामुळे आधीच पाण्यात असलेली पिके आता पूर्णतः वाया गेली आहेत.आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील पावसामुळे नांदेडहून पुढे जाणाऱ्या अनेक रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या असून काहींचे मार्ग बदलण्यात आले आहेत. त्यामुळे दक्षिणेत जाणारी रेल्वेसेवा पूर्णतः विस्कळीत झाल्याचे सांगण्यात आले.

------------------------------------------

त्यांचा हृदविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा आक्रमक होत मनोज जरांगे पाटील यांनी 27 ऑगस्टला मुंबईच्या दिशेने मोर्चा काढला. हा मोर्चा काढण्यापूर्वी लातूरमधील एका मराठा तरुणाने विष प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील शिंदगी बुद्रुक गावात ही घटना घडली होती. बळीराम मुळे (35 वर्षे) असं या तरुणाचे नाव आहे. सध्या या तरुणावर लातूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

------------------------------------------

परळी तालुक्यातील नंदनज येथील बोरणा मध्यम प्रकल्प 24 ऑगस्ट रोजी ओव्हरफ्लो झाला असून, प्रकल्पाच्या सांडव्यावरुन पाणी वाहू लागले आहे. या जलसाठ्यामुळे बोरणा मध्यम प्रकल्पाखालील नंदनज, कासारवाडी, सारडगाव ,मिरवट, मांडवा व इतर गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. तसेच सारडगाव व नंदनज परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचन क्षमतेतही वाढ झाली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही नंदनज येथील बोरणा प्रकल्प शंभर टक्के भरल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दरम्यान, सततच्या पावसामुळे बोरना नदीवरील भोजनकवाडी नागदरा येथील बिबदरा पाझर तलाव गुरुवारी सकाळी फुटला आहे. त्यामुळे तलावाखालील शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झाले आहे. मागील काही दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे परळी तालुक्यातील लघु प्रकल्पांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरम्यान, आठ दिवसांपूर्वी नागापूर येथील वाण मध्यम प्रकल्पही ओव्हरफ्लो झाला होता. या प्रकल्पातून परळी शहराला पाणीपुरवठा केला जात असल्याने परळीकरांची पिण्याच्या पाण्याची समस्या दूर झाली आहे. याशिवाय, परळी तालुक्यातील बोधेगाव मध्यम प्रकल्प, तसेच मालेवाडी, कनेरवाडी, चांदापूर ,मोहा हे लघु प्रकल्प ही शंभर टक्के भरले आहे. तसेच करेवाडी, गुट्टेवाडी, गोपाळपूर, दैठणा घाट यांसारख्या लघु प्रकल्पांमध्येही पाणीसाठा वाढल्याने सिंचनासह पिण्याच्या पाण्याचीही चिंता दूर झाली आहे.

------------------------------------------

दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन महावितरण कार्यालयासमोर करण्यात येईल इशारा त्यांनी दिला आहे

या भेटीत कराड यांनी, "गणेशोत्सव हा उत्सव भक्तिभावाने व आनंदाने साजरा केला जातो. या काळात मंडळे, घरे व व्यापारी आस्थापनांमध्ये सजावट व दिव्यांची रोषणाई केली जाते. अशा वेळी अचानक वीजपुरवठा खंडित झाल्यास सर्वत्र गैरसोय होते. त्यामुळे उत्सव काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने योग्य ती पावले उचलावीत," अशी मागणी अभियंत्यांकडे केली.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या मागणीची गंभीर दखल घेत, गणेशोत्सव काळात वीजपुरवठा अखंडित ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.

------------------------------------------

## पान 4 वरुन

सौ. प्रतिभा सुरवसे यांनी डॉ. नताशा लोढा व डॉ. रश्मी नावंदर यांचे स्वागतकेले. यावेळी डॉ. आनंद नावंदर, ज्ञानोबा सुरवसे, श्रीमती. प्रभावती नावंदर, कु. आर्या नावंदर, कु. माधुरी बदने, कु. कोमल लांडगे, कु. छकुली माने यांची उपस्थिती होती.

------------------------------------------

ऑगस्ट, 2025 रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत सन्माननीय व्यक्तींच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात येणार आहे.

दि. 30-08-2025 रोजी खुल्या वयोगटातील मॅराथॉन दौड मुले 5 कि.मी. व मुली 3 कि.मी. चे आयोजन च-हाटा फाटा ते च-हाटा रोड येथे करण्यात आले आहे. तसेच दुपारी 12:00 वा.के. पी.एस. विद्यालय, कालीका नगर, बीड येथे क्रीडा विषयक चर्चासत्राचे आयोजन, दुपारी 4 ते 6 च्या दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे तायक्वाँदो, कराटे, फुटबॉल, स्केटींग खेळाच्या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. 31-08-2025 रोजी सकाळी 8:00 वा. नागरीक सहभागातून संडे ऑन सायकल या " सायकल रॅली " चे पालवन चौक ते देवराई, पालवन येथे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी 11:00 वा. जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे 17 वर्षाखालील मुलांच्या क्रीकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त वरील प्रमाणे विविध क्रीडा उपक्रमाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत करण्यात आले आहे. सदर उपक्रमात जिल्हयातील जास्तीत जास्त विद्यार्थी, खेळाडू यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

दि. 29-08-2025 रोजी जिल्हयातील सन 2024-25 या वर्षात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या व प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार आहे. त्या करिता संबंधीत खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रमाणपत्राची व आधारकार्डची झेरॉक्स प्रत दि. 28-08-2025 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड येथे सादर करावीत अथवा dsobeed2442@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावीत.

अधिकच्या माहिती करिता क्रीडा अधिकारी अनिकेत काळे (9604959678), कालिदास होसूरकर (9421595515), सतिष राठोड (9923019353), अविनाश पाटील (9623781121), रेवननाथ शेलार (9075476791) जितेंद्र आराक (9226481728) यांना संपर्क साधवा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर हे कळवितात.

------------------------------------------

शाळेतील 90 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

------------------------------------------

पदाधिकाऱ्यांच्या यादीत रामदास बडे यांची जिल्हा सरचिटणीस म्हणून नियुक्ती झाली. हेच रामदास बडे विधानसभा काळात अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांच्या प्रचारसभेत उभे राहून, भाजपच्या उमेदवाराला पराभूत करण्याची भाषा करताना दिसले होते. त्यांचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. इतकेच नव्हे तर जिल्हा महिला अध्यक्षपदासाठी निवड झालेल्या व्यक्तींनीही धोंडे यांच्या पाठीशी उभे राहून भाजपविरोधी भूमिका घेतली होती. अशा लोकांना पदं देऊन भाजप नेमका कोणता संदेश देतोय? असा सवाल धस गट करीत आहे. जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी फेसबुकवर स्पष्ट लिहिले की ही निवड पंकजा मुंडे यांच्या आदे-शानुसार करण्यात आली. त्यामुळे खरी निवड कोणी केली जिल्हाध्यक्षांनी की मंत्री पंकजा मुंडेनी? यावर संभ्रम निर्माण झाला. धस समर्थक म्हणतात, जर सर्व नियुक्त्या मंत्री पंकजा मुंडेंच्या आदेशानेच झाल्या, तर मग आमच्या मतदारसंघाविरुद्ध काम करणाऱ्यांना पदं देण्यामागे नक्की कोणता डाव आहे? असा सवाल हे समर्थक विचरत आहे. आ. सुरेश धस यांनी विधानसभा निकालानंतरच्या विजयी सभेत उघडपणे आरोप केला होता की, पंकजा मुंडे यांनी माझ्या विरोधात काम केले. मंगळवारी झालेल्या नियुक्त्यांमुळे धस यांचे ते आरोप आता वस्तुस्थितीला धरून असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान धस व मुंडे यांच्यातील संघर्षाला या नव्या पदाधिकार्यांच्या निवडी ने पुन्हा एकदा वाद हा चिघळणार आहे.

------------------------------------------

असे. त्यांनी विडा परिसरातील 10 कुटुंबांना गायरान जमीन नावाची करून देण्यासाठी ठाम लढा दिला होता. याचबरोबर 20 हून अधिक कुटुंबांना झोपडपट्टीसाठी ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करून देण्याचे श्रेय त्यांच्या नेतृत्वाला जाते. वंचित समाजातील प्रत्येक घटकासाठी हक्काचे घरकुल, जमीन आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक चळवळींचे नेतृत्व केले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सामाजिक चळवळीतले एक लढवय्ये व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना तालुक्यात व्यक्त होत आहे.

------------------------------------------

आली आहे. त्यामुळे जुनी प्रभाग रद्द करून नवीन प्रभाग रचना अमलात आणावी यासाठी आक्षेप घेतला आहे. प्रमुख व मुख्य वस्ती आहे तसेच ठेवून प्रभाग रचना करण्यात यावी अशी मागणी अनिल उर्फ (बंडू) निसर्गन व अँड.राहुल साळवे यांनी लेखी निवेदनाद्वारे नगरपालिकेकडे केली आहे.

------------------------------------------

रईसोद्दीन इब्राहीम, रावईबाई भोले, मालनबाई साळवे, केशरबाई साळवे, गंगुबाई डोंगरे, साळुबाई कांबळे, लक्ष्मीबाई वाल्मिकी, शोभाबाई वाल्मिकी, मिराबाई आलझेंडे, चंद्रकलाबाई जावळे, मिराबाई रांजवण, छायाबाई, रमेश भिसे, अक्षय गालफाडे, राजु वाल्मिकी, राजाभाऊ मिसाळ, संजय ससाणे, मळीबा ससाणे, अमोल टाकणखार, शाम राठोड, प्रकाश शिंदे, रंजित रोमन यांच्यासह इतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

"आमची मागणी पूर्ण झाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही," असा ठाम इशारा कर्मचाऱ्यांनी या वेळी दिला आहे .

------------------------------------------

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री अमरनाथ होते. त्यांना आपल्या मार्गदर्शनातून असे आवाहन केले, की सौर ऊर्जा प्रकल्प हा किती महत्वाचा आहे. सर्वांगीण फायदा असणार एकमेव ऊर्जा स्त्रोत म्हणजेच सौर ऊर्जा स्त्रोत आहे. तो शेतकऱ्यांसाठी आर्थिक बचतीचे खूप मोठे माध्यम आहे केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारच्या या योजनेचा आपल्या शेतीमध्ये आणि घरामध्ये आपण त्याचा निश्चित फायदा घ्यावा असेही आव्हान त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले. पारंपारिक ऊर्जा स्त्रोत जे आपल्याकडे उपलब्ध आहेत कोळसा ते नैसर्गिक वायू हे नष्ट होणारे आहेत त्याला पर्याय म्हणून अ परंपारिक ऊर्जा स्त्रोत आपण वापरले पाहिजे त्यामध्ये सौर ऊर्जा पवन ऊर्जा यांचा समावेश होतो. या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सारंग जोशी, रसायनशास्त्र विभागप्रमुख, स्वा. सावरकर महाविद्यालय बीड हे होते. त्यांनी विज्ञान आणि विज्ञानात झालेल्या प्रगती याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. विज्ञानात न केलेली जी प्रगती आहे ती मानवी कल्याणासाठी किती उपयुक्त आहे याबद्दल उदाहरणे देऊन अतिशय सोप्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विज्ञानामध्ये असलेल्या विविध शाखा आणि त्या शाखेमध्ये असलेले होत असलेले संशोधन देशातील विविध संशोधन संस्थांमध्ये कशा पद्धतीने केल्या जाते याबद्दलही सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. मुकुंद देवर्षी,महाविद्यालय अर्थ समिती अध्यक्ष श्री एकनाथ जाधव उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळे, प्रा . अंकुश साबळे, सायन्स फोरमचे प्रमुख डॉ.बोरगावकर विकास, डॉ. लड्डा कमलकिशोर , बेस्ट प्रॅक्टिस विभागाचे प्रमुख डॉ. एस. बी.इंगोले, डॉ. विनायक देशमुख, उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शंकर मिटकर यांनी केले. आभार डॉ. गजानन होन्ना यांनी मानले.

------------------------------------------

मध्ये मनिषा जुगदर विजेत्या होत, अंतिम राऊंड मध्ये सहभागी झाल्या. यामध्ये मिसेस इंडिया प्रमाणे बौध्दिक क्षमता तपासण्यात आली यासाठी विविध प्रश्न विचारण्यात आले. यामध्ये सर्व प्रश्नांची उत्तरे देत मनिषा जुगदर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी शिवराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मनिषा जुगदर यांना मिसेस महाराष्ट्र गौरव पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याबदल महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे, प्रा प्रविण फुटके यांच्यासह पदाधिकारी व सिरसाळा येथील समाजबांधवांनी अभिनंदन केले आहे.

------------------------------------------

मध्ये HiV व एड्स जनजागृती अभियान घेण्यात आले. या वेळी येथील सरपंच व सर्व सदस्य आणि 100 - 150 गावकरी, ऊस मजूर आणि बांधकाम कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. त्या नंतर दुपारी चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक महा विद्यालय चिंचाळा या ठिकाणी किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही /एड्स आजार जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या वेळी प्राचार्य, मुख्याध्यपक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

यावेळी आपल्या माहितीपर भाषणात समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी एचआयव्ही एड्स आजार होण्याची कारणे, उपचार आणि हा आजार झाल्यावर घ्यावयाची काळजी याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली तसेच एच आय व्ही एड्स प्रतिबंध 2017 कायद्याबाबतीत संपूर्ण माहिती दिली.

तसेच त्यांनी किशोरवयीन मुला-मुलींनी एच आय व्ही एड्स जनजागृती आरोग्य अभियानात सहभाग नोंदवण्याचे आवाहन यावेळी केले.

या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. HIV/एड्स, STI/RTI, सकस आहार, 1097 टोल फ्री नंबर 2017 चा HIV/ एड्स प्रतिबंध कायदा या विषयी जनजागृती कार्यक्रम घेण्यात येऊन 600 युवक /युवती यांना IEC वाटप करण्यात आली.

या कार्यक्रमास शाळेतीलव कॉलेज मधील 550-600विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या वेळी LWS श्री डावरे देखील उपस्थित राहून सहकार्य केले.

------------------------------------------

# "बौद्धांनो जागे व्हा पुन्हा महार बनू नका...!"

आजही आमच्या अशिक्षित लोकांसोबतच शिक्षित व उच्च शिक्षित लोकांमध्ये जनगणनेच्या फॉर्म मध्ये धर्म आणि जात काय लिहावी असा संभ्रम कायम आहे. यावरुन समाज खरंच प्रज्ञावंत झाला का? हा प्रश्न निर्माण होतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर, 1956 रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यापूर्वी 1935 पासून त्यांनी त्याकाळातील समस्त अस्पृश्य वर्गाला आपल्या उन्नतीसाठी धर्मांतराची आवश्यकता पटवून देण्यासाठी अनेक जातीच्या सभा घेऊन मार्गदर्शन केले. पण फक्त महार जातींनी त्यांचं ऐकलं आणि 14 ऑक्टोबर, 1956 रोजी धम्म दीक्षा सोहळ्यात सहभाग घेऊन बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

या दीक्षा समारंभाच्या दुसऱ्या दिवशी दिनांक 15 ऑक्टोबर, 1956 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जमलेल्या समुदायासमोर तब्बल दोन तास भाषण करून फार मोलाचे मार्गदर्शन केले आणि अनमोल संदेश दिला. ते म्हणाले होते की, "आता केवळ राखीव जागा आणि सवलतीसाठी आम्ही महार म्हणवून घेणार नाही." कारण महार ही जात हिंदू धर्मात होती. आता आम्ही बौद्ध धर्मीय झालो. त्यामुळे "आम्हाला इज्जत प्यारी आहे, लाभ प्यारा नाही." तसेच ते म्हणाले होते की, "आम्ही बौद्ध धर्मीय झालो तरी राजकीय हक्क मी मिळवीन याची मला बालंबाल खात्री आहे. मी मेल्यावर काय होईल हे सांगता येणार नाही. पण "माझ्या पोतडीत सर्व काही भरलेले आहे....हे जे हक्क मिळविले ते मीच माझ्या लोकांच्यासाठी मिळविले. ज्याने हे हक्क मिळविले ते तो पुन्हा मिळवून देईलच." याची खात्री बाळगा.

परंतु धम्म दीक्षेनंतर अवघ्या पावणेदोन महिन्यातच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे बौद्धांना राखीव जागा व सवलती देण्याचा प्रश्न प्रलंबित राहिला.

पंतप्रधान दिवंगत व्हि.पी.सिंग यांचा निर्णय:

दिवंगत व्ही.पी.सिंग भारताचे प्रधानमंत्री झाल्यानंतर त्यांनी 1990 मध्ये बौद्ध धर्मियांना अनुसूचित जातींच्या सवलती व आरक्षण लागू करण्याचा शासन निर्णय काढला आणि बौद्धांना अनुसूचित जाती म्हणून आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्या निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र सरकारने 8 नोव्हेंबर, 1990 रोजी शासन निर्णय काढला. त्यात असे नमूद आहे की, "भारतीय घटनेच्या अनुच्छेद 341 नुसार अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश 1950 च्या परिच्छेद 3 नुसार केवळ हिंदू किंवा शीख धर्मियांना अनुसूचित जातीचे समजले जावू शकत होते. तथापि, अनुसूचित जातीमधून बौद्ध धर्मात धर्मांतरितांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळावा या हेतूने केंद्र शासनाने घटना (अनुसूचित जाती) आदेश (सुधारणा) कायदा 1990 दिनांक 3 जून, 1990 अन्वये घटना (अनुसूचित जाती) आदेश 1950 मध्ये सुधारणा करून अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश बौद्ध धर्मियांनाही लागू करण्यात आल्याचे घोषित केले आहे." त्यानुसार अनुसूचित जातीची यादी हिंदू, शीख आणि बौद्ध धर्मियांनाही आता लागू झालेली आहे." म्हणजे दिनांक 3 जून, 1990 पासून बौद्ध धर्मियांना राज्य तथा केंद्र शासनाच्या घटनात्मक तथा सर्व प्रकारच्या सवलती व आरक्षणाचा फायदा घेता येईल. तसेच ते अस्पृश्यता निवारणार्थ असलेल्या योजनांचाही लाभ मिळण्यास पात्र असतील." याचा अर्थ बौद्ध धर्मियांना 1990 पासून राज्यात आणि केंद्रात अनुसूचित जातीच्या सवलती व आरक्षण लागू आहे. त्यामुळे बौद्धांनी पुन्हा आपली जात महार नोंदविणे म्हणजे अज्ञानीपणाच म्हणावा लागेल.

संभ्रम व वास्तव आणि सन्मान :

महाराष्ट्र राज्यात बौद्धांना अनुसूचित जातीच्या सवलती मिळतात पण केंद्रात त्या मिळत नाहीत असा गोंधळ व गैरसमज हेतूतः बऱ्याच वर्षांपासून समाजात पसरविला जाऊन घट्ट केला आहे. त्यामुळे आता पुन्हा जातीनिहाय जनगणना होणार असल्याने या जनगणनेत धर्म बौद्ध पण जातीच्या रकान्यात काय लिहावे असा प्रश्न निर्माण करून समाजाला संभ्रमित व गोंधळात टाकण्याचा प्रयत्न सुरु आहे. या पार्श्वभूमीवर माझे समस्त बौद्ध धर्मियांना नम्र आवाहन आहे की, आपण धर्माच्या रकान्यात बौद्ध आणि जातीचा रकाना निरंक ठेवावा कारण बौद्ध धर्मात जाती व्यवस्था नाही. मात्र जर प्रगणक जातीचा रकाना भरण्याचा आग्रह करत असेल तर जातीच्या रकान्यात अनुसूचित जाती असा उल्लेख करावा. कोणत्याही परिस्थितीत जात महार लिहू नये. कारण भारतीय संविधानाने कोणत्याही जातीला नाही तर सामाजिक प्रवर्गाला आरक्षण व सवलती दिल्या आहेत. या प्रवर्गात कोणत्या जातींचा समावेश करावा यासाठी शासनाने जातींची यादी तयार केली आहे आणि हिंदू व शीख धर्मात जाती आहेत पण बौद्ध धर्मात जाती नाहीत. म्हणून 1990 पासून बौद्ध धर्मियांना बौद्ध म्हणूनच अनुसूचित जातीच्या सर्व सवलती व आरक्षण लागू झालेले आहे. त्यामुळे जात लिहिण्याचा प्रश्नच नाही. पण तरीही आपल्या समाधानासाठी जातीच्या रकान्यात अनुसूचित जाती असे नमूद केल्यास काहीही हरकत नाही.

महाराष्ट्र शासनाचा दिनांक 8 नोव्हेंबर, 1990 चा शासन निर्णय आहे. त्याचे अवलोकन करावे म्हणजे सर्व गैरसमज दूर होतील. म्हणून जनजागृती करणे आणि 1990 च्या शासन निर्णयाच्या माहितीचा समाजात प्रचार करणे आवश्यक आहे. " सन्मान हवा की लाचारी" याचा विचार व्हावा हीच सदिच्छा. जयभीम, जय भारत, जय संविधान...!

**प्रा. डॉ.एम.आर.इंगळे**
**सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक तथा विभागीय सचिव**
**डाटा अकोला**
**9423429060**



हॅलो बीड

परळी **संघर्षनेता**

शुक्रवार दि. 29 ऑगस्ट 2025



# प्रतिक्स मेकअप येथील "श्रीं"ची डॉ. रश्मी नावंदर, डॉ. नताशा लोढा यांच्या हस्ते आरती



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या येथील प्रतिक्स मेकअप स्टुडिओमध्ये स्थापन करण्यात आलेल्या "श्रीं"ची आज डॉ. रश्मी नावंदर व डॉ. नताशा लोढा यांच्या हस्ते आर्थिक करण्यात आली.

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी येथील नामांकित प्रतिक्स मेकअप स्टुडिओत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये श्रींची स्थापना करण्यात आली असून आज सिरसाळा येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. रश्मी नावंदर व परळी येथील प्रसिद्ध दंतरोग तज्ञ डॉ. नताशा लोढा यांच्या हस्ते आर्थिक करण्यात आली. यावेळी सौ. नावंदर व सौ. लोढा यांनी प्रतिक सुरवसे याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. प्रारंभी प्रतिक्स मेकअपचे संचालक, प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट प्रतिक सुरवसे, ऐश्वर्या ब्युटीपार्लरच्या संचालिका **पान 3 वर**

# ऑलम्पिक वीर मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन

वडवणी प्रतिनिधी

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे स्पर्धाचे आयोजन

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीडच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ऑलम्पिक वीर मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आयोजन आहे. तसेच महाराष्ट्राचे



सुपुत्र ऑलम्पिक वीर कै.खाशाबा जाधव यांचे स्मरण व करून फीट इंडिया शपथ घेवून राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीड जिल्हयातील सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय व आंतरष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेले व प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंचा राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि. 29 **पान 3 वर**

# नागरिकांनी पावसाळ्यात सुरक्षिततेची दक्षता घ्यावी...



बीड, दि.28 (जिमाका) : सद्यस्थितीत मान्सून सक्रिय असून बीड जिल्ह्यात ठिकविकाणी मुसळधार

पावसामुळे नद्या, नाले, ओढे व पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरु आहे. परिणामी अनेक

ठिकाणी पुलावरुन पाणी वाहत असून नागरिकांकडून निष्काळजीपणामुळे अपघातांच्या घटना घडत आहेत.

सदर परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत सर्व नागरिकांना खालीलप्रमाणे आवाहन व दक्षता

सूचना करण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी पावसाळ्यात पुढील प्रमाणे दक्षता घ्यावी. मुसळधार पाऊस सुरु असतांना अनावश्यक

प्रवास टाळावा. पुराचे पाणी पुलावरुन वाहत असल्यास पूल ओलांडू नये. पुराच्या पाण्यात पोहण्याचा प्रयत्न

करु नये. पाण्याच्या खोलीचा अंदाज नसेल तर पाण्यात जाऊ नये. पुलावरुन किंवा नाल्यांवरुन पाणी वाहत

असल्यास पूर पाहण्यासाठी नागरीकांनी तेथे गर्दी करु नये, तसेच नदीकाठ, ओढ्याकाठ किंवा धोकादायक

ठिकाणी सेल्फी / फोटो काढण्याचा मोह टाळावा. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्ष रहावे, नदीच्या पाणी

पातळीत वाढ होत असल्यास नदीपात्रापासून दूर जावे. पावसाच्या वेळी मुलांना नाल्याजवळ, नदीकाठी किंवा

धरण परिसरात जाण्यास परवानगी देऊ नये. धरण क्षेत्र, बंधारे व जलाशय परिसरात पाण्याचा विसर्ग होवू

शकतो, त्यामुळे त्या ठिकाणी गर्दी करणे टाळावे. वीज पडत असल्यास झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबू

नये. पुराच्या वेळी पाळीव प्राण्यांना बांधून ठेवू नये. सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. ग्रामपंचायत, पोलीस

पाटील, तलाठी किंवा स्थानिक प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे. पावसामुळे घरात पाणी

शिरण्याची शक्यता असल्यास वीजपुरवठा बंद करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, तसेच जमिनीखालून

जाणाऱ्या विद्युत तारांपासून सावध राहावे.दुषित पाणी पिऊ नये, पिण्याचे पाणी उकळून प्यावे व जेवणाआधी

हात स्वच्छ धुवून घ्यावे. पूर ओसरल्यानंतर परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रशासनास सहाय्य करावे व परिसर

स्वच्छ ठेवावा, रोगराई पसरू नये याकरिता आरोग्य विषयक खबरदारी घ्यावी. कोणत्याही आपत्कालीन

परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी (1077) त्वरित संपर्क साधावा.

नागरिकांनी या कालावधीत निष्काळजीपणा टाळून आपल्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. जिल्हा

प्रशासन सर्वतोपरी दक्ष आहे. मात्र आपत्ती टाळण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सतर्कता अत्यावश्यक आहे, असे

शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन

प्राधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दर बुधवारी बीड येथे उपलब्ध राहणार

बीड, दि.28 (जिमाका) : बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी प्रादेशिक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी बीड येथील महामंडळाच्या उपअभियंता यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. असे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.

# किशोरवयीन युवक युवती मध्ये जनजागृती ही काळाची गरज-शरद चव्हाण समुपदेशक



परळी वैजनाथ :जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष बीड आणि आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै.यांच्या संयुक्त विद्यमाने "इंटिसिफाईड अवेरनेस कॅम्पेन" अभियाना अंतर्गत आज दि. 28 ऑगस्ट रोजी महर्षी कनड विद्यालय इंडस्ट्रियल एरिया परळी या ठिकाणी किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही /एड्स आजार जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक इतर शिक्षक वृंद उपस्थित होते. यावेळी आपल्या माहितीपर भाषणात समुपदेशक श्री शरद चव्हाण यांनी एचआयव्ही एड्स आजार होण्याची कारणे, उपचार आणि हा आजार झाल्यावर घ्यावयाची काळजी याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली तसेच एच आय व्ही एड्स प्रतिबंध 2017 कायद्याबाबतीत संपूर्ण माहिती दिली. तसेच त्यांनी किशोरवयीन मुला-मुलींनी एच आय व्ही एड्स जनजागृती आरोग्य अभियानात सहभाग नोंदवण्याचे आवाहन यावेळी केले. या कार्यक्रमास **पान 3 वर**

# महात्मा बसेवश्वर गणेश मंडळ आरती महादेव इटके यांच्या हस्ते संपन्न



परळी वैजनाथ: महात्मा बसेवश्वर कॉलनी येत महात्मा बसेवश्वर गणेश मंडळ आज आरती भाजपा परळी वैजनाथ उपाध्यक्ष महादेव इटके यांच्या हस्ते संपन्न झाली यां वेळी वीरशैव विकास प्रतिष्ठान अध्यक्ष श्याम बुद्रे तलाठी रमाकांत गुजर नितीन हालगे विजय गायकवाड मंडळाचे अध्यक्ष निशांत भरत भास्कर उपाध्यक्ष अथर्व महेश स्वामी

सचिव आनंद दत्ता घेवार रोहन गायकवाड, श्रेयश मुकदम, विशाल मुकदम, वेदांत डाफने, कृष्णा तेवर व महिला आदी उपस्थित होते

# भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीवरून आष्टीत खळबळ

### आ. सुरेश धस समर्थकांत नाराजी; प्रदेशाध्यक्षांना विचारणार जाब



कडा, : बीड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या मंगळवारी झालेल्या पदाधिकारी निवडीने आष्टी मतदारसंघात मोठा राजकीय भूकंप घडवला आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या उमेदवाराविरोधात अपक्ष उमेदवाराचा जाहीर प्रचार करणाऱ्या आणि पक्षविरोधी भूमिका घेणाऱ्यांनाच जिल्हा पदाधिकाऱ्यांमध्ये स्थान दिल्याने आ. सुरेश धस यांचे समर्थक संतापले आहेत. ही नियुक्ती म्हणजे धस यांच्या आरोपांना शिक्कामोर्तबच नाही का? असा प्रश्न कार्यकर्त्यांतून विचारला जाऊ लागला असून या निवडीबाबत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे याचा जाब विचारणार आहेत. मंगळवारी जाहीर झालेल्या **पान 3 वर**

# धारूरची वाण नदी उफाळली; पुलांवरून कार-रिक्षा वाहून गेले, एकाचा मृत्यू, एक बेपत्ता



किल्ले धारूर (बीड) : धारूर तालुक्यात बुधवारी (दि. 27) रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे वाण नदीला पूर आला असून धारूर-आसरडोह आणि धारूर-आडस मार्गावरील दोन पूल पाण्याखाली गेले आहेत. या पाण्याच्या प्रवाहात रात्री चारचाकी आणि रिक्षा वाहून गेल्याने दोघे बेपत्ता होण्याच्या दोन धक्कादायक घटना घडल्या आहेत. दरम्यान, यातील एकाच मृतदेह सापडला असून अद्याप एकजण बेपत्ता आहे. गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात मुसळधार पाऊस सुरु आहे. तांदळवाडी धरण भरून वाहत असून त्यामुळे आवरगाव व अंजनडोह येथील पूल पाण्याखाली गेले आहेत. बुधवारी रात्री रुईधारुरहून अंजनडोहकडे जाताना रात्री आठ वाजता आडत व्यापारी नितिन शिवाजीराव कांबळे (वय 42) यांची कार पुलावरून वाहून गेली. प्रशासन, पोलीस व गावकऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबवली. अखेर गुरुवारी सकाळी सहा वाजता पुलापासून एक किलोमीटर अंतरावर त्यांच्या मृतदेहाचा शोध लागला दरम्यान, आवरगाव पुलावरुनही रात्री बारा वाजता एक रिक्षा वाहून गेल्याचे वृत्त समोर आले आहे. या अपघातात अनिल बाबूराव लोखंडे ( 26 ) हा तरुण बेपत्ता असून त्याचा शोध सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना इशारा दिला आहे की, नदी, नाला किंवा ओढा ओलांडताना पाण्याची पातळी धोकादायक नाही याची खात्री करूनच प्रयाण करावे. **पान 3 वर**

# केज तालुक्यातील दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते मच्छिंद्र वाघमारे यांचे निधन



केज । प्रतिनिधीकेज तालुक्यातील विडा येथील दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते मच्छिंद्र मुगाजी वाघमारे (वय अंदाजे 65) यांचे सोमवारी सकाळी अंबाजोगाई येथे उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने तालुक्यातील दलित चळवळ, सामाजिक कार्य क्षेत्र आणि ग्रामीण भागातील वंचित समाजातून हळहळ व्यक्त होत आहे.

1980-90 च्या दशकात सामाजिक न्यायासाठी धडपड करणारे नेते म्हणून वाघमारे यांचे नाव आदराने घेतले जात **पान 3 वर**

# बीड नगरपरिषद प्रभाग रचना प्रकरणी आक्षेप दाखल - अनिल उर्फ (बंडू) निसर्गन



बीड प्रतिनिधी - नगरपरिषद बीड येथे जुनीच प्रभाग रचना जाहीर केली आहे. व या प्रभाग रचनेविषयी पक्ष अर्ज दाखल करण्याची मुदत 31ऑगस्ट 2025 अशी आहे. अनेक प्रभागातील वस्त्यांची व नगरांची फोड करून अनेक मतदारावर अन्याय केला आहे. याचा आक्षेप प्रभाग चार मधील अनिल उर्फ (बंडू) निसर्गन व अँड. राहुल साळवे यांनी आक्षेप नोंदवला आहे. प्रभाग चार विषयी आक्षेप अर्ज दि. 25 ऑगस्ट 2025 रोजी विधीज्ञ जुनी प्रभाग रचना बदलून नवीन प्रभाग रचना तयार करावी म्हणून आक्षेप मुख्याधिकारी नगरपरिषद तथा निवडणूक अधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे पालन जुनी प्रभाग रचना निर्माण करताना केली नाही. काही लोकांचा राजकीय फायदा व्हावा या दृष्टिकोनातून मुख्य वस्त्यांचे विभाजन करून दुसऱ्या प्रभागात नावे जोडण्यात **पान 3 वर**

# सातव्या वेतन आयोगाचा 5 वा हप्ता देण्यात यावा – नगर परिषद कर्मचाऱ्यांचे उपोषण



माजलगाव प्रतिनिधी : येथील नगर परिषदेतील सर्व कर्मचारी सातव्या वेतन आयोगाचा पाचवा हप्ता तात्काळ मंजूर करण्यात यावा, या मागणीसाठी दिनांक 28 ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालय माजलगाव येथे उपोषणास बसले आहेत.

यापूर्वी दिनांक 21 ऑगस्ट रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र वारंवार मागणी करूनही दखल न घेतल्यामुळे सर्व कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या उपोषणात विशाल शिंदे, कैलाश भिसे, गोविंद साबळे, श्रावण ढगे, बन्सी वाघमारे, राम मिसाळ, एकनाथ टाकणखार, दिनकर कांबळे, चत्रभुज मिसाळ, आनंत वाघमारे, सय्यद आरेफ, सिकंदर खान, नसरुल्ला खाँ, **पान 3 वर**

# सोलार ऊर्जेचा वापर पर्यावरणाशी सुसंगत - अमरनाथ खुर्पे



माजलगाव (अनंत घडसिंगे )- येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील बेस्ट प्रॅक्टिस विभागाच्या अंतर्गत सौर ऊर्जेचा वापर करण्याच्या संदर्भामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये "सौर ऊर्जा पॅनल आणि ऊर्जा बचत उपक्रम" हा उपक्रम घेऊन महाविद्यालय शैक्षणिक गुणवत्ते सोबतच सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना आणि सर्व नागरिकांना सौरऊर्जेचे महत्त्व पटवून देण्यासाठी विचार आणि प्रसार करणार आहे त्या दृष्टिकोनातून या विभागाचे उद्घाटन आणि विभागाची गुगल फॉर्म ची लिंक चे उद्घाटन करण्यात आले. . या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून **पान 3 वर**

# मिसेस महाराष्ट्र गौरव पुरस्काराने मनिषा जुगदर सन्मानित



परळी वैजनाथ दि. 28 (प्रतिनिधी) तालुक्यातील सिरसाळा येथील महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या जिल्हा उपाध्यक्षा मनिषा जुगदर यांना शिवराज बहुउद्देशीय संध्या विरार मुंबई यानी आयोजित केलेल्या मिसेस महाराष्ट्र स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिवराज बहुउद्देशीय संस्था विरार मुंबई येथे मिसेस महाराष्ट्र या राज्यस्तरीय स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील एकमेव स्पर्धक म्हणून मनिषा जुगदर यांची निवड झाली होती. या स्पर्धेत विविध राऊंड घेण्यात आले. या सर्व राऊंड **पान 3 वर**

# चिंचाळ्यात एड्स जनजागृती अभियान संपन्न



वडवणी प्रतिनिधी आज दिनांक 26/08/2025 रोजी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व ग्रा. रु चिंचवण चे वैधकीय अधीक्षक डॉ श्री करमाळकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष बीड आणि आयसीटीसी विभाग ग्रामीण रुग्णालय चिंचवण यांच्या संयुक्त विद्यमाने अभियाना अंतर्गत आज दि. 26 ऑगस्ट रोजी इन्टेन्सिफाइड IEC Campain अंतर्गत सकाळी चिंचाळा येथील ग्रामपंचायत **पान 3 वर**